


फुले आणि मी

मनोरमा जफा

चित्रकार
जया रस्तोगी व्हीटन, सुधीर कासलीवाल



ISBN 81-237-2701-1

पहिली आवृत्ती 1991 (शके 1913)
तिसरी आवृत्ती 1999 (शके 1921)

Flowers and I (*Marathi*)

रु. 8.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110 016 यांनी प्रकाशित केले

नेहरू बाल पुस्तकालय

फुले आणि मी

मनोरमा जफा

अनुवाद : मृणालिनी पाठक

चित्रे : जया रस्तोगी व्हीटन, सुधीर कासलीवाल



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

मोहन जमा करतो पोस्टाची तिकिटे,
रीता गोळा करते मोराचे पंख,
सोहन जमा करतो शंख आणि शिंपले,
झीनत गोळा करते नाणे,
मी पण आता कांही तरी नवी वस्तू जमा करणार,
मी जमा करणार निरनिराळी फुले.



मी माझ्या बागेत गेले
तिथं गुलाब आणि झेंडूची फुलं लगडलेली आहेत,
खसखशीची, वाटाण्याची आणि कन्हेरीची पण फुले आहेत.
मी त्या सर्व फुलांमधून एकएक फूल आणले,
आणि त्यांना बाबांच्या शब्दकोशांमध्ये दाबून ठेवले.



माझ्या शेजाऱ्यांच्या बागेत ब्रह्मांडाची
झिनिया आणि पिंक ची फुले आहेत,
मी हळूवार पावलांनी बागेत शिरलो,
पण माळ्यानं मला पकडलेच
इतक्यात शेजारी पण आले,
मी त्याना माझा छंद सांगितला तर ते खूप झाले,
त्यांनी मला पुष्कळ फुले दिली. फ्लॉक्स स्नॅपड्रॅगन आणि गुलखेर
घरी येऊन मी ती सर्व फुले
वेग-वेगळ्या पुस्तकात ते दाबून ठेवले.



फ्लॉक्स



सूर्यफूल







स्नैपड्रैगन
गुलखेर

एक दिवस शाळेच्या वाटेवर,
मी पिवळी सूर्यफूले, पांढरी चाफेकळी
व लिलिची मोहक फुले पाहिली
मी दप्तर खाली ठेवले
आणि सुंदर फुले तोडून आणली.







कण्हेरीचे फूल

एक दिवस आई म्हणाली
''रवि ! तू मोठ्या झाडांची फूले पण गोळा कर''.
तर मी सावरीच्या झाडांची फूले तोडून आणली,
नंतर पळसाच्या झाडाचे फूल पण आणले,
पिवळा अमलतास आणि गुलाबी कचनार,
ह्या सगळ्यांना मी मोठमोठ्या पुस्तकात दाबून ठेवले !

मी सतत दहा महिने
फूलं जमा करत राहिलो.
नंतर मी नाणी जमा केली
व पाच चित्रसंग्रह आणले.




कचनार
सेमल

एका चित्रसंग्रहामध्ये मी
हंगामाप्रमाणे फूले चिकटवली
खसखशीची, पॅन्सी, व वाटाण्याची,
दूसऱ्या मध्ये मोठ्या झाडांची फूले
जसे सेमल आणि कचनारची,
तिसऱ्यामध्ये वाडीमधले आणि झुडपातील फूले
जशी छोटी घाणेरी आणि लाल कण्हेर.



चवथ्यामध्ये वेगळ्या प्रकारची फूले
जशी आसामचे वंदाक,
काश्मीरचे केसर-फूल,
पाचव्या चित्रसंग्रहामध्ये मी
चमेली, मोगरा रातराणी सारखी
गोड वासांची फूले
सफाईने व कलात्मक रीतीने चिकटवली
नंतर प्रत्येक फूलांचे खाली त्याचे नाव आणि
ती फुल फुलतात त्या स्थळांची नांव लिहिली

FLOWERS FROM SHRUBS
SWEET SMELLING FLOWERS
FROM TREES
RS

एक दिवस वसंत ऋतूच्या कोवळ्या उन्हात
सकाळी-सकाळी सगळे मित्र आणि मी,
आप-आपली वस्तू घेऊन आलो,
आणि एका झाडाखाली गोळा झालो.



मोहनने आपली टपाल तिकिटे दाखवली,
काही जूने तर काही नवीन कित्येक देशांची
ज्यांत भारताची, इंग्लंडची, अमेरिका व कॅनडाची होती.





रीताने पक्ष्यांचे पंख दाखवले,
छोटे व मोठे, पंख ज्यात
मोराचे व हुप्पोची पंख
आणखी पुष्कळ प्रकारचे पंख होती.




सोहनने आपले शिंपले दाखवले
त्यात। छोटे व मोठे शिंपले व
पांढरे-ठिपकेदार व
अनेक प्रकारचे शिंपले होते.









झिनतने आपल्या जवळची नाणी दाखवली
त्यात चांदीची व, पितळेची
गोल-चौकोनी व षटकोनी,
जुनी-नवी-छोटी व मोठी
पुष्कळ प्रकारची नाणी होती।

आता माझी वेळ आली
मी एका नंतर एक चित्रसंग्रह काढले.







खसखशीचे फूल




कलात्मक रितीने सजवलेले माझे फूल आणि त्यांचा नाव
आणि त्यांची मिळण्याची स्थळांची नाव पण दाखवली,
अशाप्रकारे माझ्या मित्रांनी माझे पाची चित्रसंग्रह पाहिले.





Parrot's Bill (Clianthus)

रीता म्हणाली, ''उत्कृष्ट चित्रसंग्रह आहे''
मोहन म्हणाला ''फारच छान छंद आहे''
जीनत म्हणाली ''हे तर झाकलं-माणिकच निघालं''
सोहन म्हणाला ''खरंच, हा तर अगदी नवीन छंद आहे''
रीता म्हणाली ''रवि सारखे आम्ही पण आमचे चित्रसंग्रह करु''




मोहनने टपाल-तिकिटांचा चित्रसंग्रह केला.
रीताने पंखाचा संग्रह,
झिनतने नाण्यांचा संग्रह,
अगदी माझ्यासारखे,
आणि सोहनने आपली शिंपले शो-केसमध्ये ठेवले.
आता आम्ही आमचे चित्रसंग्रह
सोहनच्या घरी एका खोलीत वेग-वेगळ्या रीतीने ठेवले
आणि हाच आमचा छोटासा संग्रहालय आहे.



printed at JJ Offset Printers, 7, Press Area, Wazirpur, Delhi-35





रु. 8.00 ISBN 81-237-2701-1

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया